**विषय : जिल्हा परिषद मुख्यालयांतील खाते प्रमुखांना भेटावयास येणारे अभ्यागंतासाठी भेटण्याचा दिवस व वेळ निश्चित करणे बाबत....**

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जावक क्रमांक : मुकाअ/वै.का/ १६२ /२०१७.
नाशिक, दिनांक : ०५ /०७/२०१७.

**-: परिपत्रक :-**

ग्रामीण भागातील येणारे ग्रामस्थ/अभ्यागत त्यांचे कामकाजाच्या होणेच्या दृष्टीकोनातुन जिल्हा परिषदेतील संबंधित खाते प्रमुखाची भेट घेण्यासाठी येत असतात, मात्र बऱ्याच वेळा संबंधित खाते प्रमुख त्यांचे फिरतीमुळे व शासकीय बैठकांमुळे ग्रामीण भागातील आलेले ग्रामस्थ/अभ्यागत यांची भेट होत नाही, परिणामी ग्रामस्थ/अभ्यागत यांचा वेळ व पैसा खर्च होतो व काम देखील होत नाही, यामुळे सदरचे ग्रामस्थ माझेकडेस विभाग प्रमुख यांची भेट होत नसल्याचे आमचे कामकाज बऱ्याच दिवसांपासुन प्रलंबित आहे, अशा प्रकारच्या गंभीर तक्रारी प्राप्त होत असतात.

यास्तव सर्व खाते प्रमुख यांना याव्दारे सूचीत करण्यांत येते की, ग्रामीण भागातील त्यांचे कामकाजासाठी येणारे ग्रामस्थ/अभ्यागत यांना भेटण्यासाठी आठवडयातील दोन वार व वेळ निश्चित करण्यांत यावेत व तसा फलक कार्यालयाच्या दर्शनीय भागात लावण्यांत यावा.

भेटावयास आलेले ग्रामस्थ/अभ्यागताचे नांव, गांव/ तालुका, त्यांचे कामाचे स्वरुप इ.बाबीसंबंधातील एक नोंदवही ठेवण्यांत यावी, सदरच्या नोंदवहीमध्ये अद्यावत नोंदी घेण्यांत याव्यांत. व सदरची नोंदवही प्रत्येकी महिन्यांत माझे अवलोकनार्थ ठेवावी.

सदरचे परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यांत येऊन, स्थायी आदेश संचिकेमध्ये सामील करण्यांत यावा.

EXECUTIVE OFFICER ... PARISHAD, NA...

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

**प्रति,**

०१. खातेप्रमुख, जिल्हा परिषद, नाशिक (सर्व) --------------------
०२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक.

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर.**

०१. मा.सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
०२. मा.अध्यक्षा/उपाध्यक्ष, सभापती, विषय समिती (सर्व), जिल्हा परिषद, नाशिक.
०३. मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
०४. मा.जिल्हाधिकारी, नाशिक.

**प्रत :** अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.
**प्रत :** कार्यालयीन प्रत/ज्ञापन नस्ती.
**प्रत :** साप्रवि/आय.टी.सेल.
२/- सदरचे परिपत्रक जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्दसाठी.